# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय
गडचिरोली दिनांक १९/१२/२०१८

आरोग्य धनवर्षा डेव्लपर्स ॲन्ड अलाईड लीमीटेड कंपनी रजिस्ट्रेशन क्रं. MSCS/CR/294/2012- रजिष्टर ऑफीस १४/०२ विक्रम मार्ग एस.एस. हॉस्पीटल फ्रिगंज उजैन्न (मध्यप्रदेश) आणी ए.डी.व्हि. क्रेडीट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमीटेड २०८ सिटी प्लाझा ५०४ एम. जी. रोड इंदौर (मध्यप्रदेश)- 452001 चे संचालकांनी मौजा गडचिरोली स्थित गडचिरोली ते चंद्रपुर रोड दरम्यान बट्टुवार कॉम्पलेक्स मध्ये भाडयाची खोली घेवुन माहे फरवरी २०११ मध्ये कंपनीचे संचालकांनी कंपनीची शाखा स्थापन करुन अभिकर्त्याच्या मार्फतीने आर.डी., फिक्स डिपाजिट, अशा प्रकारच्या योजना राबवुन ठेवीदारांकडुन मोठया प्रमाणात रकमा गोळा करुन ठेवीदारांना कमी कालावधीत जास्त व्याजदरांचे आमीष दाखवुन ठेवी ठेवण्यास अप्रामाणीकपणाने प्रोत्साहित करुन ठेवीदारांच्या ठेवीचे हितसंबधाचे रक्षण न करता तसेच ठेवीदारांच्या ठेवीमधुन ठेवीदारांचा फायदा होईल असे कोणत्याही योजनेची व्यवस्था केली नाही.सदर योजना राबविण्यास तसेच गुंतवणुकदारांकडुन ठेवी स्वीकारण्यास सेक्युरिटी ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने मनाई केली असतांना सुध्दा कंपनीचे संचालकानी गुंतवणुकदारांकडुन मोठया प्रमाणात ठेवी स्वीकारुन नियोजनपुर्वक संगणमताने कट रचुन,समान उद्देशाकरीता विश्वासाने सोपविण्यात आलेल्या रकमेचा अपहार करुन ठेवीदारांना त्यांची रक्कम परतफेड न करता स्वत:चे फायदयाकरीता वापरुन गडचिरोली येथील कंपनीचे कार्यालय बंद करुन ठेवीदारांची आर्थीक फसवणुक केली. अशा मजकुराचे ठेवीदार (फिर्यादी ) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन कंपनी तसेच संबधीत संचालक मंडळ यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गडचिरोली येथे अपराध क्रमांक १७३/२०१८ कलम ४२०, ४०६, ३४ भादवि सहकलम ३,४ महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्था मधील) हितसंबधाचे अधिनियम सन १९९९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाची व्यापकता व गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधिक्षक साहेब गडचिरोली यांचे आदेशान्वये व त्यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक प्रदिप व्हि. चौगावकर, स्थानिक गुन्हे शाखा,पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली हे करीत आहेत.

नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने कंपनीमधील गुंतवणुकदारांना जाहिर आवाहन करण्यात येते की, ज्या-ज्या गुंतवणुकदारांनी आरोग्य धनवर्षा डेव्लपर्स ॲन्ड अलाईड लीमीटेड आणी ए.डी.व्हि. क्रेडीट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमीटेड या कंपनीमध्ये ठेवी स्वरुपात रक्कम गुंतवविलेली आहे. त्या गुंतवणुकदारांनी सदर कंपनीत ठेवीच्या स्वरुपात रकमा गुंतविलेल्या आहेत त्यासंबधातील बॉंड (पॉलीसी), कंपनीत शेवटचा हप्ता भरल्याची पावती, बॅंक पासबुक प्रत, आधार कार्ड, इत्यादी दस्तऐवजांच्या छायांकित प्रती संबधीत एजंटाच्या माध्यमाने किंवा स्वत: स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथे हजर होवुन माहिती दयावी. जेणे करुन सदर कपंनीच्या आर्थीक फसवणुकिच्या व्याप्ती संबधात तपास करणे सोयीचे होईल. कार्यालयाचा संपर्क क्रमांक :- Office Phone No. 07132-223174